# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

क्र.पु.वि.मं./शाखा-क/ ३८
पुणे ४११ ००५.
दि. ०३.०४.२०१७

## प्र क ट न

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.
जिल्हा- पुणे/अहमदनगर/सोलापूर.

**विषय**- शास्त्रीय कला/चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत...

**संदर्भ**- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण कला व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/ एस.डी.२/दि.०७.जानेवारी २०१७
२) शासन शुध्दीपत्र क्रमांक-उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एसडी-२/दि.०७.०३.२०१७
३) शासन शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२/दि.१४.०३.२०१७ चे पत्र.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/ एसडी२, दि.१६.०३.२०१७
५) क्र.पु.वि.मं./शाखा क/३१२४,दि.२५.०३.२०१७ चे प्रकटन.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आदींना सूचित करण्यात येते की, कला (नृत्य/गायन/वादन), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२०२./एसडी-२,दि.०७.०१.२०१७ निर्गमित केलेला आहे. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या इ.१०वीच्या विद्यार्थ्यांना मार्च २०१८ च्या परीक्षेपासून वाढीव सवलतीचे गुण देण्यात येईल असे त्यामध्ये नमूद केलेले होते.

तद्नंतर शासनाने शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२,दि.१४.०३.२०१७ निर्गमित केलेले असून त्यामध्ये शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण मार्च २०१८ पासून होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेऐवजी **शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना मार्च २०१७ पासून होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेमध्ये पुढीलप्रमाणे वाढीव गुणांची सवलत देण्यात यावी** असे निर्देश दिले आहेत.

तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२, दि.१६ मार्च २०१७ मध्ये नमूद केलनुसार ज्या संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना वाढीव गुण देण्यात येणार आहेत त्या संस्थांची निवड करण्याची जबाबदारी सांस्कृतिक कार्य विभागाकडे सोपविण्यात आलेली आहे. यानुसार शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, यांनी क्र.संकीर्ण-९२१७/प्र.क्र.४१/सां.का-४, दि.०१.०३.२०१७ अन्वये मार्च २०१७ पासून होणा-या माध्यमिक शालांत

प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (इ.१०वी) वाढीव गुणांची सवलत देण्याकरिता शास्त्रीय गायन, नृत्य व वादन या क्षेत्रातील १९ संस्था व लोककला प्रकारातील २९ संस्थांची यादी प्रसिध्द केली आहे.

तरी सर्व माध्यमिक शाळांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करुन प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्यात यावेत

१)सदर सवलत फक्त नियमित, खाजगी नियमित विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ठ होणारे विद्यार्थी तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांना लागू राहणार नाही.

२)कला सवलतीचे गुण संबंधित विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास उत्तीर्ण होण्यास जितके गुण कमी पडत असतील तितके गुण अनुज्ञेय असलेल्या गुणविभागणीप्रमाणे एक किंवा सर्व विषयात कमाल मर्यादेत विभागून देण्यात येतील व उर्वरित शिल्लक गुण संबंधित विद्यार्थ्यांच्या एकूण गुणांमध्ये/टक्केवारीमध्ये जमा करण्यात येतील.

३)उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेले गुण एकूण गुणांमध्ये स्वतंत्रपणे क्रीडा गुणांच्या प्रचलित पध्दतीनुसार दर्शविण्यात येतील.

४) कला सवलतीचे गुण दिल्यास गुणांची टक्केवारी सरासरी १०० टक्के पेक्षा जास्त होणार नाही.

५)कला सवलतीचे गुण कोणत्याही पारितोषिकासाठी ग्राहय धरले जाणार नाहीत.

६)विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमूद शासन निर्णय/शासन शुध्दीपत्रकाच्या अनुषंगाने मार्च २०१७ साठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) साठी प्रविष्ठ झालेल्या व शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या व लोककला प्रकारात सहभागी झालेल्या संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या संस्थेच्या प्रमाणपत्रासह शाळेच्या मुख्याध्यापकांकडे दि.२०.०४.२०१७ पर्यंत विहित नमून्यात सादर करावेत.

७)तसेच संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.०१.०३.२०१७ रोजीच्या शासननिर्णयातील संस्थांकडील संबंधित विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र प्रमाणित करुन दि.०७.०१.२०१७ रोजीच्या शासननिर्णयमध्ये नमूद केलेल्या कलाप्रकाराच्या प्राविण्यानुसार अनुज्ञेय होणा-या गुणांच्या शिफारशीसह संबंधित विभागीय मंडळाकडे शाळेच्या लेटरहेडवर प्रस्ताव सादर करावेत. ज्या विद्यार्थ्यांना या प्रकारात गुण द्यावयाचे आहेत त्या विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे प्रमाणित करुन तसेच किती गुण द्यावेत याची शिफारस करुन, मान्यताप्राप्त संस्थांची यादी त्यासोबत सादर करावी.

८)या संदर्भात मुख्याध्यापकांनी त्यांचेकडील सर्व प्रस्ताव दि.३०.०४.२०१७ पर्यंत सोबत जोडलेल्या विहित नमून्यातील अर्जासोबत संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करावेत.

९)विद्यार्थ्यांनी दि.२०.०४.२०१७ पर्यंत व शाळांनी दि.३०.०४.२०१७ पर्यंत प्रस्ताव सादर करावयाचे असले तरी काही कारणाने विद्यार्थ्यांनी उशीरा प्रमाणपत्र सादर केल्यास, शाळांनी फक्त या वर्षापुरतेच त्यांचे प्रस्ताव संबंधित विभागीय मंडळाकडे सादर करावेत. कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधीत मुख्याध्यापकांनी घ्यावी.

९) एखादा विद्यार्थी एकापेक्षा जास्त संस्थामध्ये कला विषयक व क्रीडा विषयक शिक्षण घेत असल्यास व एकापेक्षा जास्त कला अथवा क्रीडा विषयांमध्ये प्राविण्य प्राप्त करीत असला तरी त्यास सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कमाल मर्यादा २५ गुण असेल.

सोबत : १) अर्जाचा नमूना
२) शिफारसपत्राचा नमूना
३) प्रपत्र - १५

03/04/2017
विभागीय सचिव,
**पुणे विभागीय मंडळ,**
**पुणे ४११ ००५.**

**प्रत माहितीसाठी**
**मा.शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**पुणे/अहमदनगर/सोलापूर.**

E:\NYG\PRAKATAN

शास्त्रीय कला, चित्रकला/लोककला प्रकारात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकांना वाढीव गुणांची सवलत मिळणेबाबत करावयाच्या अर्जाचा नमूना

प्रति,

मा.मुख्याध्यापक

----------------

----------------

अर्जदार- कुमार/कुमारी-------------------------

महोदय,

मी चित्रकला/गायन/वादन/नृत्य/नाट्य/लोककला या परीक्षेत खालील प्रमाणे प्राविण्य मिळवले आहे.

पुर्ण नाव- कुमार/कुमारी---------------------------------------

जन्मतारीख----------------------

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) मार्च ------- बैठक क्रमांक---------

कलाप्रकार-------------------------

परीक्षा------------------------------उत्तीर्ण वर्ष-----------------

क्रमांक/श्रेणी -----------------------

प्रमाणपत्र देणा-या संस्थेचे नाव-------------------------

- सोबत या परीक्षेचे/स्पर्धेचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

तरी मला या परीक्षेचे/स्पर्धेचे वाढीव गुण मिळावेत. ही विनंती.

आपला/आपली आज्ञाधारक

(विद्यार्थी/विद्यार्थीनीचे नाव)

## शास्त्रीय कला, चित्रकला/लोककला प्रकारात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना वाढीव गुणांची सवलत देणेबाबत मुख्याध्यापकांनी विभागीय मंडळाकडे शिफारस करावयाच्या पत्राचा नमूना

दिनांकः ---/---/-----
जा.क्र.-------------

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
-----------विभागीय मंडळ,----------

विषयः-कला विषयातील सवलतीचे वाढीव गुण देणेबाबत...
संदर्भ :-

महोदय,

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या शाळेतील/विद्यालयातील कुमार/कुमारी---------- -------------------- हा माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) मार्च------ बैठक क्रमांक------------ ने प्रविष्ठ झाला असून, त्याने/तीने खालील कला प्रकारात/परीक्षेत प्राविण्य मिळविलेले आहे.

| अ. क्र. | कला प्रकार | परीक्षा/स्पर्धेचे नाव | प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेचे नाव व पत्ता | नोंदणी क्रमांक | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी/ क्रमांक | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चित्रकला | | | | | | |
| २ | नृत्य | | | | | | |
| ३ | गायन | | | | | | |
| ४ | वादन | | | | | | |
| ५ | लोककला प्रकार | | | | | | |

सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी च्या अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पाहिलेली आहे. त्यानुसार त्याला/तिला--------सवलतीचे वाढीव गुण देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्याध्यापक स्वाक्षरी-------------
नावः------------------------

टिपः- एखादा विद्यार्थी एकापेक्षा जास्त कला विषयक उपक्रम/परीक्षा यांमध्ये अथवा क्रीडा प्रकारांमध्ये प्राविण्य प्राप्त करित असेल तर त्यास दोन्ही मिळून सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कमाल मर्यादा २५ गुण असेल.

## "प्रपत्र – क"

संस्थेचे नाव :

पत्ता :

सांस्कृतिक कार्य विभाग नोंदणी क्रमांक------------------------------- ,दिनांक

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी --------------------------- याने / हिने (शास्त्रीय कला प्रकाराचे नांव) ------------------------------------------------------------ या कला प्रकारातील ------- परीक्षा उत्तीर्ण झाला / झाली आहे.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ----------------------- याने / हिने मागील --- वर्षातील -------- या लोककला प्रकारात एकूण ----- प्रयोगात सहभागी झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थी / विद्यार्थिनी ही सन २०१७ मधील माध्यमिक शालांत परीक्षेत (इयत्ता १० वी) सवलतीचे वाढीव गुण घेण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ : अध्यक्ष / सचिव

संबंधित संस्थेचे नाव

दिनांक : (रबरी शिक्क्यासह)

*टीप :- "अ" किंवा "ब" यापैकी लागू नसेल ते खोडावे.*